जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 SEP 2017 Times of India

# 55 students raise questions during youth parliament on Shivaji University campus

TIMES NEWS NETWORK

TOI



Students participating in the youth parliament

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) hosted a youth parliament on its campus last week. Member of Parliament (MP) Sanjaykaka Patil was present at the event. The minister interacted with the participants.

Patil said while raising questions in the parliament one needs to know the details of the issue thoroughly. Awareness of the issue opens up new gates for development.

CAMPUS BUZZ

The minister also raised concerns over the rising commercialisation of education across the country. He said that the practice needs to be stopped.

D T Shirke, pro-vice-chancellor of SUK, said that to complete something, one needs to master the art of listening. It gives ample chance for all around development for everyone.

According to university officials, as many as 55 students participated in the youth parliament. They were felicitated with certificates.

**World Medical Design Hackathon begins:**

Yadrav based Sharad Institute of Technology and College of Engineering hosted the 'World Medical Design Hackathon' event. According to institute officials, as many as 30 world renowned institutes participated in the event. Three of them were from India.

The event has been sponsored by the US based Purdue University. More than 2,500 students will be participating at the event.

**University celebrates World Ozone Day:**

Shivaji University, Kolhapur (SUK) celebrated World Ozone Day earlier last week on the university campus. Pro vice-chancellor of SUK D T Shirke was present for the event along with other experts. The celebrations were followed by a host of events organised at the campus. The events included quiz competition, photography competition, 'rangoli' competition, debate, poster-making competition. The celebrations lasted throughout the week. University officials said, the event is held every year.

'25 SEP 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आज उद्घाटन

## तीनदिवसीय महोत्सव : विविध स्पर्धांत दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**गारगोटी : प्रतिनिधी**

येथील मौनी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठअंतर्गत ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्या (सोमवारी) उद्घाटन होत आहे. सोमवारी सकाळी साडेनऊ वाजता उद्घाटन समारंभ होईल. यानंतर दिवसभरात विविध स्पर्धा होतील. तीन दिवस हा महोत्सव होणार असल्याची माहिती मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी दिली.

मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष, आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवतील. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव



**गारगोटी : मौनी विद्यापीठात मध्यवर्ती युवा महोत्सवानिमित्त उभारलेले मुख्य स्टेज.**

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर प्रमुख पाहुणे आहेत. मौनी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी प्रमुख उपस्थित राहतील. या महोत्सवाची कर्मवीर हिरे महाविद्यालयाने जय्यत तयारी केली आहे. सोमवारी दिवसभरात लोकवाद्यवृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी वक्तृत्व, हिंदी वक्तृत्व, इंग्रजी वक्तृत्व, वादविवाद आदी स्पर्धा होतील. मुख्य स्पर्धा मौनी विद्यापीठाच्या मैदानावरील मुख्य स्टेजवर होतील. इतर स्पर्धा विद्यापीठातील महात्मा फुले सदन, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कर्मवीर हिरे ज्युनिअर कॉलेज, क्रांतिसिंह नाना पाटील व्यासपीठ येथे होतील. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातल्या विविध महाविद्यालयांतील शेकडो संघांसह पंधराशेहून अधिक विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत. महोत्सवासाठी मौनी विद्यापीठ परिसरात स्वच्छता अभियान राबविले आहे. स्वागत अध्यक्ष व संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, अध्यक्ष, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे, उपाध्यक्ष प्रा. ए. जे. गोडसे, सचिव डॉ. शहाजी वारके, सहसचिव प्रा. शशिकांत चव्हाण, डॉ. संजय देसाई यांनी महोत्सवासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची भोजन, पाणी व्यवस्था, कार्यक्रम स्थळ, स्टेज व्यवस्था, बैठक व्यवस्थेचे नेटके नियोजन केले आहे.

25 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# गारगोटीत आजपासून युवा महोत्सव

## तीनदिवसीय आयोजन : विविध स्पर्धांत हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग

गारगोटी, ता. २४ : येथील मौनी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवास उद्या (सोमवारी) प्रारंभ होत आहे. सकाळी साडेनऊ वाजता उद्घाटन होईल. यानंतर दिवसभरात विविध स्पर्धा होतील. तीन दिवस हा महोत्सव होईल, अशी माहिती मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी दिली.

मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष, आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर प्रमुख पाहुणे आहेत. मौनी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी प्रमुख उपस्थित राहतील. कर्मवीर हिरे महाविद्यालयाने या महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. सोमवारी दिवसभरात लोकवाद्य वृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी वक्तृत्व, हिंदी वक्तृत्व, इंग्रजी वक्तृत्व, वादविवाद आदी स्पर्धा होतील. मुख्य स्पर्धा मौनी विद्यापीठांच्या मैदानावरील मुख्य स्टेजवर होतील.

इतर स्पर्धा विद्यापीठातील महात्मा फुले सदन, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कर्मवीर हिरे ज्युनिअर कॉलेज, क्रांतिसिंह नाना पाटील व्यासपीठ येथे होतील. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातल्या विविध महाविद्यालयांतील शेकडो संघासह पंधराशेहून अधिक विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत.



**गारगोटी : मौनी विद्यापीठात मध्यवर्ती युवा महोत्सवानिमित्त उभारलेले मुख्य स्टेज.**

25 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गारगोटी येथे मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आज उद्घाटन

**गारगोटी / प्रतिनिधी :**
येथील मौनी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठांतर्गत ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सोमवार, दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता उद्घाटन होणार आहे. दिवसभरात विविध स्पर्धा होतील, अशी माहिती मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी दिली. मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष व आ. सतेज पाटील उद्घाटन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवतील. प्र. कुलगुरू डॉ. डी.



**गारगोटी : मौनी विद्यापीठात मध्यवर्ती युवा महोत्सवानिमित्त उभारण्यात आलेले मुख्य व्यासपीठ.**

टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर प्रमुख पाहुणे आहेत. सोमवारी दिवसभरात लोकवाद्यवृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व, वादविवाद आदी स्पर्धा होतील. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतल्या विविध महाविद्यालयांतील शेकडो संघांसह पंधराशेहून अधिक विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2017
लोकमत

## गारगोटीत आज मध्यवर्ती युवा महोत्सव

गारगोटी : येथील मौनी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ३७व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आज, सोमवारी उद्घाटन होत आहे. सोमवारी सकाळी साडेनऊ वाजता उद्घाटन समारंभ होईल. यानंतर दिवसभरात विविध स्पर्धा होतील. तीन दिवस हा महोत्सव होईल, अशी माहिती मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी दिली. मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष, आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भूषवतील. प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर प्रमुख पाहुणे आहेत. मौनी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी प्रमुख उपस्थित राहतील. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातल्या विविध महाविद्यालयातील शेकडो संघासह पंधराशेहून अधिक विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'मौनी'त आजपासून युवा महोत्सव

**गारगोटी** : येथील श्री मौनी विद्यापीठात २५ ते २७ सप्टेंबरअखेर शिवाजी विद्यापीठांतर्गत मध्यवर्ती युवा महोत्सव होत आहे.

मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. आर. डी. बेलेकर म्हणाले, 'मौनी विद्यापीठात पहिल्यांदाच हा तीन दिवसीय महोत्सव होत आहे. तीन दिवसात चार व्यासपीठावर हे कार्यक्रम होतील. यात २८ प्रकारच्या स्पर्धांचा समावेश असून, अंदाजे शंभर महाविद्यालयांतील बाराशे ते पंधराशे विद्यार्थी सहभागी होतील. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेते संघ यात सहभागी होतील.' २५ सप्टेंबरला सकाळी ८ ते ९ या वेळेत नोंदणी होणार असून, त्यानंतर उद्घाटन समारंभ होईल.

२६ सप्टेंबरला पाश्चिमात्य एकलगीत, पाश्चिमात्य समूहगीत, लोकनृत्य, सुगमगायन, मूकनाट्य लघुनाटिका, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय सुरवाद्य, पोस्टर मेकिंग, व्यंगचित्रण, मातीकाम, स्पॉट फोटोग्राफी होणार आहे. २७ सप्टेंबरला नकला, एकपात्री, प्रश्नमंजुषा, स्पॉट पेंटिंग स्पर्धा व समारोप, बक्षीस वितरण कार्यक्रम होईल.

25 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात यंदापासून रेशीमशास्त्र पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू होत आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यास मान्यता दिली आहे. रेशीम शेती कमी खर्चात, कमी कालावधीत व सातत्याने मासिक आर्थिक मिळकत मिळवून देणारी आहे.



रोजगाराची प्रचंड क्षमता व सहजपणे करता येत असल्याने त्याचे ग्रामीण भागात विकासात मोठे योगदान आहे. हा अभ्यासक्रम रेशीम शेती करू इच्छिणाऱ्या व करणाऱ्या शेतकरी बेरोजगार तरुण व महिलांना उद्योजकता विकास स्वावलंबनासाठी फायद्याचा ठरणार आहे.

दोन्ही अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीचे असून, पदविकास अभ्यासक्रमासाठी दहावी उत्तीर्ण, तर जे शेतकरी रेशीम शेती करतात, त्यांच्यासाठी हे प्रगत तंत्रज्ञान मिळावे व शेती फायद्याची ठरावी म्हणून आठवीपर्यंत शिक्षणाची अट आहे. पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या वर्षी (ॲड ऑन) प्रवेश घेता येईल. अभ्यासक्रमासाठी पंचवीस सप्टेंबरपासून प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. अधिक माहितीसाठी प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राणिशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2017
लोकमत

# कमला कॉलेज, शिवाजी विद्यापीठात सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कमला कॉलेज व शिवाजी विद्यापीठ मराठी विषय शिक्षक संघ यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला.

ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, कमला कॉलेज मराठी विभाग प्रमुख डॉ. सुजय पाटील, शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर, संघाचे सचिव डॉ. अरुण शिंदे, डॉ. दीपक दळवी, डॉ. नेताजी पोवार, डॉ. जे. बी. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 SEP 2017
तरूण भारत

# विद्यापीठात एनसीसी कॅम्पला प्रारंभ

**कोल्हापूर :** ५६ महाराष्ट्र बटालिएन एनसीसीच्या वतीने २१ ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये संचलनासाठी मार्गदर्शन कॅम्प सुरू आहे. या कॅम्पमध्ये नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन संचलनाकरिता आंतरविभागीय पथक निवड करण्यात येणार आहे. हा कॅम्प शिवाजी विद्यापीठातील एनसीसी भवन येथे सुरू आहे. या शिबिरामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील ४०० छात्रांनी सहभाग नोंदवला आहे.

या कॅम्पमध्ये ड्रील, फायरिंग, गार्ड ऑफ ऑनर, बेस्ट कॅडेट कॉम्पीटीशन, सांस्कृतीक व राष्ट्रीय एकात्मता आदींची तयारी करून घेतली जाणार आहे. ले. कर्नल डिसिल्वा, मेजर थिमापुरकर, कॅम्प अडज्युटंड मेजर डॉ. अशोक डोनर, कॅप्टन मोहन विरकर आदी छात्रांना प्रशिक्षण देणार आहेत.